नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे
YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - १३८ Issue - 138 | वार सोमवार दि. ६ ऑक्टोबर २०२५ Blow- Monday Date 6 October 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# पूरग्रस्त शेतकऱ्यांसाठी केंद्र सरकार भरीव मदत करणार

## केंद्रीयमंत्री शाह यांच्या हस्ते पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखान्याचा नूतनीकरण शुभारंभ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

शिर्डी, दि. ५: अतिवृष्टी व पुरामुळे महाराष्ट्रातील शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून महाराष्ट्र शासनाकडून नुकसानीचा तपशीलवार अहवाल मिळताच केंद्र सरकार क्षणा-चाही विलंब न करता शेतकऱ्यांसाठी भरीव मदत जाहीर करेल, अशी ग्वाही केंद्रीय गृह व सहकार मंत्री अमित शाह यांनी दिली.

लोणी येथे पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील व पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विठ्ठलराव विखे पाटील यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अना-वरण व पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखान्याच्या नूतनीकरण शुभारंभप्रसंगी केंद्रीय मंत्री शाह बोलत होते. कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, जलसंपदा मंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे आदी मान्यवर उपस्थित होते.

केंद्रीय मंत्री शाह म्हणाले, केंद्र सरकारने २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी ३ हजार १३२ कोटींची मदत मंजूर केली आहे. यापैकी एप्रिलमध्ये १ हजार ६३१ कोटी वाटप करण्यात आले असून, यात महाराष्ट्रासाठी २१५ कोटींचे विशेष मदत पॅकेज देण्यात आले आहे. कर्जवसुलीवर तात्पुरती स्थगिती व विद्यार्थ्यांसाठी परीक्षांमध्ये सवलती यांसारखे अनेक निर्णय घेण्यात आले आहेत.

पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील व पद्मविभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील यांनी सहकार आंदोलन, ग्रामीण विकास व शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी केलेले कार्य अभूतपूर्व आहे. त्यांच्या कार्याच्या पायावर आज महाराष्ट्रातील सहकार क्षेत्र उभे आहे. पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील, धनंजयराव गाडगीळ व वैकुंठभाई मेहता यांनी सहकार चळवळीची पायाभरणी केली. विखे पाटील यांनी देशातील पहिला सहकारी साखर कारखाना सुरू करून शेतकऱ्यांच्या आर्थिक सक्षमीकरणाचा पाया रचला. व्यापाऱ्यांच्या घरात जाणारा पैसा शेतकऱ्यांच्या खात्यात जाऊ लागला.



डॉ. बाळासाहेब विखे पाटील यांनी अटल बिहारी वाजपेयी यांच्या सरकारमध्ये वित्त राज्यमंत्री म्हणून काम पाहिले. त्यांनी आरबीआयमार्फत गुजरातमधील सहकारी बँकांना वाचविणारे महत्त्वपूर्ण 'रिव्हायव्हल पॅकेज' मिळवून दिले, असे केंद्रीय मंत्री शाह म्हणाले. केंद्र सरकारने शेतकऱ्यांचा १० हजार कोटींहून अधिक प्राप्तिकर माफ केला आहे. यामुळे सहकारी साखर कारखान्यांवरील वार्षिक १०० कोटींचा कर भार दूर झाला आहे. साखर उत्पादनासाठी लागणाऱ्या मोलायसिसवरील जीएसटी २८ टक्क्यांवरून ५ टक्क्यांपर्यंत कमी करण्यात आला असून ३९५ वस्तूंवरील जीएसटी दरही घटविण्यात आले आहेत. सहकारी साखर कारखान्यांनी मल्टी-फीड इथेनॉल प्रकल्प उभारावेत, ज्यातून मका व तांदळापासूनही इथेनॉल तयार करता येईल. अशा प्रकल्पांसाठी केंद्र सरकार कर्ज उपलब्ध करून देईल व इथेनॉल खरेदीत सहकारी संस्थांना प्राधान्य दिले जाईल, असेही केंद्रीय मंत्री शाह यांनी सांगितले.

भारताला जगात पहिल्या क्रमांकावर आणण्यासाठी या दिवाळीत आपण सर्वांनी एकत्र येऊन घरात कोणतीही परदेशी वस्तू आणणार नाही असा संकल्प करावा. देशातील १४० कोटी लोकांनी व व्यापाऱ्यांनी 'मेक इन इंडिया'चा अंगीकार केला, तर २०४७ पूर्वी भारत जगातील पहिल्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनेल, असेही शाह यांनी नमूद केले.

**नदीजोड प्रकल्पाद्वारे राज्याचा दुष्काळ दूर करणार – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, पद्मश्री डॉक्टर विठ्ठलराव विखे पाटील यांनी महाराष्ट्रात सहकाराची चळवळ रुजवली आणि आणि माजी केंद्रीय राज्यमंत्री पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील यांनी जल नियोजनाच्या संदर्भात महाराष्ट्रात जागृती घडवून आणली. या दोघांच्या पूर्णाकृती पुतळ्यांचे अनावरण हे 'पद्मस्मरण' आहे असे म्हटले तर चुकीचे होणार नाही. आशियातील पहिला सहकारी साखर कारखाना असलेल्या प्रवरानगर येथील सहकारी साखर कारखान्याने १० हजार टीपीडीपर्यंत आता मजल मारली आहे. ही खरोखर अतिशय आनंदाची गोष्ट आहे, असे मुख्यमंत्री म्हणाले.

प्रधानमंत्री मोदी यांनी पहिल्यांदा सहकाराचे महत्त्व समजून घेतलं आणि स्वतंत्र सहकार मंत्रालय स्थापन केले आणि सहकारातला कार्यकर्ता म्हणून पहिले सहकार मंत्री म्हणून केंद्रीय मंत्री शाह यांना जबाबदारी देण्यात आली. सहकारमंत्री म्हणून जबाबदारी घेतल्यानंतर त्यांनी वेगाने निर्णय घेऊन या क्षेत्रातील धुरिणींना चकित केले. राज्यातल्या सहकार क्षेत्राला बळकटी देण्यासाठी ८ ते १० हजार कोटींची मदत देण्यात आली. सहकार चळवळ रुजविण्याचे कार्य केंद्र सरकारच्या चांगल्या निर्णयाने होत आहे. साखर कारखान्याच्या सर्क्यूलर इकॉनॉमी विकसित करण्यासाठी आता प्रयत्न करावे लागतील. साखर कारखान्याचा मालक शेतकरी आहे, म्हणून त्याच्या पाठीशी शासन उभे राहील, अशी ग्वाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली. शेतकऱ्याला अतिवृष्टीच्या संकटातून सावरण्यासाठी आराखडा तयार करण्यात येत असून लवकरच भरीव मदत करण्यात येईल, यात केंद्र सरकारचेही सहकार्य मिळेल, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिदे, अजित पवार यांचीही भाषणे झाली.

# पश्चिम बंगालच्या दार्जिलिंगमध्ये भूस्खलन, १७ जणांचा मृत्यू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दार्जिलिंग : पश्चिम बंगालच्या दार्जिलिंग जिल्ह्यात झालेल्या मुसळ-धार पावसामुळे मोठ्या प्रमाणात भूस्खलन झाले आहे. ज्यामध्ये आतापर्यंत किमान १७ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती मिळाली आहे. दार्जिलिंगमधील भूस्खलनामुळे अनेक घरे कोसळली आहेत आणि प्रमुख रस्ते खराब झाले आहेत. अनेक दुर्गम गावांचा संपर्क पूर्णपणे तुटल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली आहे.



अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, मृतांची संख्या वाढू शकते, कारण अनेक भागात शोध आणि बचाव कार्य अजू-नही सुरू आहे. उत्तर बंगाल विकास मंत्री उदयन गुहा यांनी परिस्थिती चिंताजनक असल्याचे वर्णन केले. त्यांनी सांगितले की स्थानिक अधिकाऱ्यांकडून मिळालेल्या माहितीनुसार, आतापर्यंत १७ जणांचा मृत्यू झाला आहे. एएफपीच्या वृत्तानुसार, २० जणांचा मृत्यू झाला आहे.

दार्जिलिंगमधील विनाशकारी आ-पत्तीला प्रतिसाद देण्यासाठी जिल्हा प्रशासन, पोलिस आणि आपत्ती व्यवस्थापन पथकांकडून मदत आणि बचाव कार्य सुरू आहे. सर्वात जास्त प्रभावित क्षेत्रांपैकी एक असलेल्या मिरिक तलाव परिसरात एनडीआरएफ तैनात करण्यात आले आहे.

दार्जिलिंगच्या सरस-ाली, जसबीरगाव, मिरिक बस्ती, धार गाव (मेची) आणि मिरिक तलाव परिसरात भूस्खलनामुळे मृत्यू झाल्याची नोंद झाली आहे. अधिकाऱ्यांच्या मते, धार गावात ढिगाऱ्यातून चार जणांना जिवंत बाहेर काढण्यात आले आहे, जिथे भूस्खलनात अनेक घरे वाहून गेली होती. कठीण भूभाग असूनही बचाव पथके त्यांचे बचाव कार्य सुरू ठेवत आहेत. भूस्खलनामुळे मिरिक-सुखियापोखरी रस्त्यासह अनेक पर्वतीय रस्त्यांवरील वाहनांची वाहतूक ठप्प झाली आहे आणि उंचावरील ठिकाणांशी संपर्क तुटला आहे. अनेक गावे पूर्णपणे वेगळी झाली आ-हेत. परिस्थिती अत्यंत चिंताजनक आहे. मिरिकमध्ये ११ आणि दार्जिलिंगमध्ये ६ जणांचा मृत्यू झाला आहे. मृतांचा आकडा आणखी वाढू शकतो. सततच्या पावसामुळे मदत आणि बचाव कार्यात अडथळा येत आहे. हा परिसर अत्यंत निसरडा आहे आणि अनेक घरे कोसळली आहेत. नुकसानीचा संपूर्ण अंदाज अद्याप बाकी आहे. भारतीय हवामान विभागाने (आयएमडी) दार्जिलिंग आणि कालिम्पोंगसह उप-हिमालयीन पश्चिम बंगालसाठी रेड अलर्ट जारी केला आहे. ६ ऑक्टोबरपर्यंत या भागात अतिवृष्टीचा इशारा देण्यात आला आहे. येत्या काही दिवसांत पुन्हा भूस्खलन आणि रस्ते बंद होण्याचा इशारा अधिकाऱ्यांनी दिला आहे.

**अनेक गावांचा संपर्क तुटला, बचावकार्य सुरु**

विष्णुलाल गाव, वॉर्ड ३ लेक साइड आणि जसबीर गाव (मिरिक) येथील अनेक कुटुंबांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आले आहे. स्थानिक स्वयंसेवी संस्था आणि जिल्हा प्रशासनाच्या मदतीने तात्पुरते मदत शिबिरे उभारण्यात येत आ-हेत.

# करमाळ्यात कार आणि दुचाकीचा भीषण अपघात, तिघांचा जागीच मृत्यू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : सोलापूर जिल्ह्यातील करमाळा तालुक्यात भीषण अपघात झाल्याची घटना घडली आहे. वीट येथील भुजबळ वस्तीजवळ इनोव्हा कार व मोटारसायकलचा भीषण अपघात झाला आहे. या अपघ-ातात मोटारसायकलवरील तीन जणांचा जागीच मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. या घटनेमुळं परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. करमाळा तालुक्यात इनोव्हा कार व मोटारसायकलचा भीषण अपघात झाला आहे. यामध्ये तीन जणांचा जागीच मृत्यू झाला आहे. या अपघातात मोटारसायकलवरील हनुमंत केरु फलफले (३५), कांचन केरु फलफले (३०, दोघे रा. अंजनडोह, ता. करमाळा) व स्वाती शरद काशीद (२५, ता. सराफवाडी, ता. इंदापूर) यांचा मृत्यू झाला आहे. दरम्यान, या अपघाताचे कारण अद्याप अस्पष्ट आहे. नेमका अपघात कसा झाला, कोणाची चूक होती, याबाबतची माहिती अद्याप मिळा-लेली नाही.

# चक्रीवादळामुळे मराठवाडा, मध्य महाराष्ट्रात पावसाचा अलर्ट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : सध्या अरबी समुद्रात 'शक्ती' नावाचे चक्रीवादळ सक्रिय झाले असून, ते पुढील काही तासांत अधिक तीव्र होण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.



गेल्या महिन्याभरापासून महाराष्ट्रात मुसळधार पावसाने हजेरी लावली आहे. विशेषतः मराठवाड्याला पावसाने अक्षरशः झोडपले.

गावागावांमध्ये पूर परिस्थिती निर्माण झाली. शेत पाण्याखाली गेली. वाहतुकीवर मोठा परिणाम झाला.

ही सगळी परिस्थिती आटोक्यात येते ना येते तोपर्यंत चार-पाच दिवसांच्या विश्रांतीनंतर पुन्हा एकदा मराठवाड्यात पा-वसाला पोषक वातावरण निर्माण झाली आहे.

दुसरीकडे अरबी समुद्रात शक्ती नावाची चक्रीवादळ सक्रिय झाले असून कोकण किनारपट्टी तसेच मुंबई ठाणे या जिल्ह्यांना पावसाचे अलर्ट आहेत.

पुढील चार दिवस हवामान खात्याने मराठवाडा विदर्भ व मध्य महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांना पा-वसाची शक्यता वर्तवली आहे.

५ ऑक्टोबर रोजी पालघर ठाणे, नाशिक धुळे नंदुरबार व छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याला पा-वसाचा येलो अलर्ट आहे. तर मराठवाड्यात बहुतांश ठिकाणी हलक्या पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

६ ऑक्टोबर रोजी नागपूर, भंडारा ,गोंदिया, चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्याला येलो अलर्ट देण्यात आलाय. तर परभणी, हिंगोली, धाराशिव ,लातूर, नांदेड तसेच धुळे, जालना, नंदुरबार जिल्ह्याला हलक्या पावसाची शक्यता देण्यात आली आहे.

७ ऑक्टोबर रोजी पालघर, ठाणे, नाशिक, धुळे ,नंदुरबार व छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याला येलो अलर्ट देण्यात आले आहेत. तर मुंबई, रायगड, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, धाराशिव, बीड, जालना ,जळगाव या जिल्ह्यांना हलक्या पावसाची शक्यता आहे.

८ ऑक्टोबर रोजी परभणी हिंगोली तसेच रत्नागिरी सात-ारा सांगली जिल्ह्याला पावसाचा येलो अलर्ट देण्यात आलाय. मध्य महाराष्ट्र व मराठवाड्यात हलक्या पावसाची शक्यता आहे.

९ ऑक्टोबर रोजी रत्नागिरी सिंधुदुर्ग सातारा कोल्हापूर जिल्ह्यासह धाराशिव जिल्ह्याला येलो अलर्ट आहे.

**मध्य प्रदेश आणि राजस्थान जिल्ह्यांमध्ये १८ लहान मुलांचा मृत्यू**

**हे औषध कुठल्याही मेडिकलमध्ये सापडलं तर फोन करा**

# महाराष्ट्रात कोल्ड्रिफ सिरपच्या विक्री, उत्पादन आणि वितरणावर बंदी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्र सरकारने लहान बालकांच्या आरोगाच्या पार्श्वभूमीवर मोठा निर्णय घेतला आहे. राज्य सरकारने वादग्रस्त ठरलेल्या कप सिरफ 'कोल्ड्रिफ'वर बंदी घातली आहे. राज्याच्या अन्न आणि नागरी पुरवठा विभागाकडून हा मोठा निर्णय घेण्यात आला आहे. खोकल्याच्या औषधामुळे विषबाधा होऊन चिमकल्यांचा मृत्यू झाल्याचा धक्कादायक प्रकार मध्य प्रदेशात समोर आला होता. यानंतर इतर राज्यांमध्ये असा काही प्रकार समोर येत होता. संबंधित प्रकरण हे सुप्रीम कोर्टातही गेलं होतं. या प्रकरणी चिमुकल्या मुलांच्या आरोग्याशी कोणताही धोका उद्भवू नये यासाठी राज्याच्या अन्न आणि नागरी पुरवठा विभागाने संबंधित औषधावर बंदी घातली आहे.

महाराष्ट्रात कोल्ड्रिफ सिरपच्या विक्री, उत्पादन आणि वितरणावर बंदी घालण्यात आली आहे. या सिरपमुळे मध्य प्रदेश आणि राजस्थान जिल्ह्यांमध्ये आतापर्यंत १८ लहान मुलांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. त्यानंतर महाराष्ट्र राज्याने या वादग्रस्त औषधावर बंदी घातली आहे.

महाराष्ट्राच्या अन्न आणि औषध प्रशासनाने टोल फ्री नंबर जारी केला आहे. कोणत्याही औषधांच्या दुकानात किंवा मेडिकलमध्ये कोल्ड्रिफ सिरप आढळल्यास टोल फ्री क्रमांकावर फोन करुन माहिती देण्याचं आवाहन करण्यात आलं आहे.

कोल्ड्रिफ सिरपचा वापर तत्काळ थांबवा, असे निर्देश अन्न आणि औषध प्रशासन विभागाकडून देण्यात आले आहे. या सिरपमुळे मध्यप्रदेश आणि राजस्थानमध्ये काही मुलांच्या मृत्यूच्या घटना समोर आल्या आहेत. या घटनांच्या पार्श्वभूमीवर नागपूरात आजपासून शोध मोहीम हाती घेण्यात आली आहे, असे एफडीएचे सहआयुक्त मनीष चौधरी यांनी सांगितले.

मध्य प्रदेश आणि राजस्थानमध्ये दूषित कफ सिरपमुळे लहान मुलांचा मृत्यू झाल्याचा संशय व्यक्त करण्यात येत असल्याच्या पार्श्वभूमीवर विविध राज्यांनी कफ सिरपविरोधात शड्डू ठोकले आहे. मध्य प्रदेश सरकारने कोल्ड्रिफ या कफ सिरपवर बंदी घातली आहे, तर केरळ सरकारने या कफ सिरपची विक्री व वितरण स्थगित केले आहे.

मध्य प्रदेशमधील छिंदवाडा जिल्ह्यात संशयास्पद किडनी संसर्गामुळे १४ मुलांचा मृत्यू झाल्याने राज्य सरकारने शनिवारी कोल्ड्रिफ सिरपच्या विक्रीवर बंदी घातली. महाराष्ट्रातील एफडीएनेही अशा घटना होऊ नये यासाठी खबरदारी घेण्याच्या सूचना स्थानिक यंत्रणांना दिल्या आ-हेत. या पार्श्वभूमीवर नागपुरा-तील एफडीए कार्यालयाने घाऊक औषध विक्रेत्यांची तपासणी मोहीम हाती घेतली आहे. संशयित औषध विक्रेत्यांकडील नमुने गोळा करून ते प्रयोगशाळेत पाठविण्यात येईल, असे चौधरी यांनी सांगितले.

मध्यप्रदेशातील छिंदवाडा जिल्ह्यातील किमान १४ मुले नागपूरातील सरकारी आणि खाजगी रुग्णालयात मृत्यूशी झुंज देत आ-हेत. त्यांना बंदी असलेले कोल्ड्रिफ कफ सिरप देण्यात आले आहे. प्रयोगशाळेचा अहवाल प्राप्त झाला असून नागपुरात दाखल झालेल्यांचा मृत्यू डायथिलीन ग्लायकोल (डीईजी) च्या विषारीपणामुळे झाल्याचे आता स्पष्ट झाले आहे.

सुरुवातीला हे मृत्यू तीव्र एन्सेफलायटीस सिंड्रोम (एईएस) मुळे झाल्याचे गृहीत धरले जात हो-ते. मात्र खोकला आणि तापासाची लक्षणे असलेल्या या रुग्णांबाबत सरकारी डॉक्टरांनी संशय व्यक्त केला होता. आता सत्य पुढे आल्याने नागपूर महापालिकेने सर्व वैद्यकीय व्यावसायिकांसाठी मार्गदर्शक तत्त्वे जारी केले आहेत. यात पाच वर्षांखालील मुलांना कफ सिरप लिहून देऊ नये, असा सल्ला देण्यात आला.

तीन रुग्ण अत्यवस्थ असून दोघे गंभीर आहेत. मूत्रपिंड निकामी झाल्यामुळे मृत्यूमुखी पडलेल्या सहा मुलांना कोल्ड्रिफ सिरप देण्यात आले होते. विषारी औषधीमुळेच किडणी निकामी होते, असे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या बोलरोग विभागाचे प्रमुख डॉ. मनीष तिवारी यांनी सांगितले.

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
सोमवार दि. ६ ऑक्टोबर २०२५ 

## संपादकीय....

### भूस्खलन

पश्चिम बंगालच्या दार्जिलिंग जिल्ह्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे मोठ्या प्रमाणात भूस्खलन झाले आहे. ज्यामध्ये आतापर्यंत किमान १७ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती मिळाली आहे. दार्जिलिंगमधील भूस्खलनामुळे अनेक घरे कोसळली आहेत आणि प्रमुख रस्ते खराब झाले आहेत. अनेक दुर्गम गावांचा संपर्क पूर्णपणे तुटला आहे. यामुळे मृतांची संख्या वाढू शकते, कारण अनेक भागात शोध आणि बचाव कार्य अजूनही सुरू आहे. उत्तर बंगाल विकास मंत्री उदयन गुहा यांनी परिस्थिती चिंताजनक असल्याचे वर्णन केले. त्यांनी सांगितले की स्थानिक अधिकाऱ्यांकडून मिळालेल्या माहितीनुसार, आतापर्यंत १७ जणांचा मृत्यू झाला आहे. एएफपीच्या वृत्तानुसार, २० जणांचा मृत्यू झाला आहे, असे समजते. दार्जिलिंगमधील विनाशकारी आपत्तीला प्रतिसाद देण्यासाठी जिल्हा प्रशासन, पोलिस आणि आपत्ती व्यवस्थापन पथकांकडून मदत आणि बचाव कार्य सुरू आहे. सर्वात जास्त प्रभावित क्षेत्रांपैकी एक असलेल्या मिरिक तलाव परिसरात एनडीआरएफ तैनात करण्यात आले आहे. दार्जिलिंगच्या सरसाली, जसबीरगाव, मिरिक बस्ती, धार गाव (मेची) आणि मिरिक तलाव परिसरात भूस्खलनामुळे मृत्यू झाल्याची नोंद झाली आहे. अधिकाऱ्यांच्या मते, धार गावात ढिगाऱ्यातून चार जणांना जिवंत बाहेर काढण्यात आले आहे, जिथे भूस्खलनात अनेक घरे वाहून गेली होती. कठीण भूभाग असूनही बचाव पथके त्यांचे बचाव कार्य सुरू ठेवत आहेत. भूस्खलनामुळे मिरिक-सुखियापोखरी रस्त्यासह अनेक पर्वतीय रस्त्यांवरील वाहनांची वाहतूक ठप्प झाली आहे आणि उंचावरील ठिकाणांशी संपर्क तुटला आहे. अनेक गावे पूर्णपणे वेगळी झाली आहेत. परिस्थिती अत्यंत चिंताजनक आहे. मिरिकमध्ये ११ आणि दार्जिलिंगमध्ये ६ जणांचा मृत्यू झाला आहे. मृतांचा आकडा आणखी वाढू शकतो. सततच्या पावसामुळे मदत आणि बचाव कार्यात अडथळा येत आहे. हा परिसर अत्यंत निसरडा आहे आणि अनेक घरे कोसळली आहेत. नुकसानीचा संपूर्ण अंदाज अद्याप बाकी आहे. भारतीय हवामान विभागाने (आयएमडी) दार्जिलिंग आणि कालिम्पोंगसह उप-हिमालयीन पश्चिम बंगालसाठी रेड अलर्ट जारी केला आहे. ६ ऑक्टोबरपर्यंत या भागात अतिवृष्टीचा इशारा देण्यात आला आहे. येत्या काही दिवसांत पुन्हा भूस्खलन आणि रस्ते बंद होण्याचा इशारा अधिकाऱ्यांनी दिला आहे.


# आरक्षण, उपवर्गीकरण, न्याय वगैरे वगैरे -

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अलिकडे महाराष्ट्रात अनुसूचित जातीमध्ये आरक्षण उपवर्गीकरणाची मागणी जोर धरू लागली आहे. अनुसूचित जातीतील एकूण ५९ जातींपैकी केवळ मांग/मातंग यांनीच ही मागणी केलेली दिसते. या मागणी सोबतच आर्थिक आधारावर आरक्षण असावं या आरक्षणाच्या मुळावरच घाव घालणाऱ्या मागण्या उच्चवर्णीयांसह अहोरात्र फुले शाहू आंबेडकरांचे नाव जपणाऱ्या तथाकथित राष्ट्रवादींकडून होतांना दिसते. विशेष म्हणजे त्याचवेळेस राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी जर हजारो वर्ष आपल्या लोकांनी सहन केलं आहे तर त्या आपल्या लोकांना वर घेऊन येण्यासाठी दोनशे वर्ष आपण सहन केलं तर काय फरक पडतो? असं म्हणून त्यांनी जातीय आरक्षणाचं समर्थन केलं. याचं भागवतांनी पूर्वी आरक्षणाचा लाभ कोणाला आणि किती काळासाठी मिळावा हे पाहण्यासाठी 'अराजकीय समिती' स्थापन करण्याचा प्रस्ताव ठेवला होता. २०१७ मध्ये तत्कालीन संघाचे प्रसिद्धी प्रमुख मनमोहन वैद्य यांनी आरक्षण चालू ठेवण्यास विरोध केला होता. त्यावेळी वैद्य म्हणाले होते, आरक्षण हे समतेच्या तत्त्वाच्या विरोधात आहे. त्यांना संधी द्या, आरक्षण नाही. परंतु आज संघ जात आधारित आरक्षणाचं समर्थन करताना दिसतो उलटपक्षी पुरोगामी समजल्या जाणाऱ्या शरद पवार यांची लेक व पुतण्या आर्थिक आधारावर आरक्षण असावे अशी भूमिका मांडताना दिसतात. हे एक अजबच कोडं आहे.

मागील भागात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतःवर होणाऱ्या पक्षपातीपणावर कसे उत्तरे दिली हे आपण पाहिले. १९५० ला संविधान लागू झाले तेव्हापासून अनुसूचित जाती व जमातींना शैक्षणिक व सरकारी नोकरीत आरक्षण लागू झाले. १९५० ते आजतागायत अनुसूचित जाती जमाती साठी आरक्षित असलेल्या नोकऱ्यांचा प्रचंड अनुशेष बाकी आहे त्यावर अनुसूचित जातीतील बौद्ध सोडले तर एकाही जातीगटाने आवाज उठवला नाही. एवढेच नव्हे तर न्यायालयाच्या खांद्यावर बंदूक ठेवून आरक्षणाच्या तत्त्वालाच उद्ध्वस्त करण्याचे प्रयत्न झाले तेव्हाही बौद्धेतरांनी चुप्पी साधली. महाराष्ट्रातील बौद्धांनी वेळोवेळी निवेदने, धरणे, निदर्शने, मोर्चे काढून आरक्षण शाबूत ठेवण्यासाठी कंबर कसली.

आरक्षणावर पहिला घाव असा पडला. वर्ष होते १९५१ चंपाकम दोराईराजन या ब्राह्मण विद्यार्थिनीला वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश नाकारण्यात आला कारण ती आरक्षित प्रवर्गात मोडत नव्हती. तिने मद्रास उच्च न्यायालयात याचिका दाखल केली, ज्यामध्ये असा युक्तिवाद करण्यात आला की मद्रास प्रेसिडेंसीचा शासकीय आदेश ( १९२७) तिच्या मूलभूत अधिकारांचे उल्लंघन करते. उच्च न्यायालयाने शासकीय आदेश रद्द केला. प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेले. मद्रास उच्च न्यायालयाचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने कायम ठेवला. परिस्थिती हाताळण्यासाठी आणि मागासवर्गीयांसाठी विशेष तरतुदींना परवानगी देण्यासाठी, भारतीय संविधानातील पहिली दुरुस्ती मंजूर करण्यात आली. यामुळे अनुच्छेद १५ मध्ये कलम (४) जोडण्यात आला, ज्यामुळे राज्याला अनुसूचित जाती आणि जमातींसह सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गांच्या प्रगतीसाठी विशेष तरतुदी करता आल्या. यानंतर बहुचर्चित मंडल आयोगाच्या शिफारशीनुसार १९९० मध्ये व्ही.पी.सिंग सरकारने ओबीसींसाठी आरक्षण धोरणाच्या अंमलबजावणीसाठी आदेश काढले. यावेळी सवर्णांनी प्रचंड विरोध केला. राजीव गोस्वामी या आंदोलकाने आत्मदहन केले. याचवेळेस इंद्रा साहनी व इतर विरुद्ध भारत सरकार' (१९९२) ही याचिका सर्वोच्च न्यायालयापुढे आली. मुख्य न्यायमुर्ती एम.एन. वेंकटचलैया होते. ९ जजेसच्या बेंचने ६ विरुद्ध ३ असा बहुमताने निकाल दिला. जस्टीस बीपी जीवन रेड्डी यांनी निकाल वाचला. आरक्षण हे ५०% च्या वर असू नये व अनुसूचित जाती-जमातीचे पदोन्नतीतील आरक्षण हे ५ वर्षांनी रद्द करावे असे निकालात नमूद केले. क्रिमीलेयरची अट याच निकालात



ठेवण्यात आली. हा वार जरी मंडल प्रणित ओबीसी आरक्षणावर असला तरी अजा व अजचे पदोन्नतीतील आरक्षण संपविण्याचा हा घाट होता. यावर कर्मचारी संघटनांनी असंतोष व्यक्त केला. १९९५ ला भारतीय संविधानाची ७७ वी दुरुस्ती करण्यात आली. या दुरुस्तीद्वारे संविधानाच्या कलम १६ मध्ये एक नवीन उपकलम (४अ) जोडण्यात आले, ज्यामुळे राज्याला अनुसूचित जाती आणि जमातींच्या कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीमध्ये आरक्षणाची तरतूद करता येणं शक्य झाले.

१९९५ ला आर. के. सबरवाल विरुद्ध पंजाब सरकार', या याचिकेत सर्वोच्च न्यायालयाने मागासवर्गीयांना सरकारी नोकऱ्यात प्रवेशानुकूल रोस्टर पद्धतीच्या विरुद्ध निकाल दिला.

याचवर्षी 'भारत सरकार विरुद्ध वीरपाल सिंह' या याचिकेत सर्वोच्च न्यायालयाने अनु. जाती-जमातीच्या कर्मचाऱ्यांची वरिष्ठता रद्द ठरविली. अनुसूचित जाती-जमातीचा उमेदवार पदोन्नती मिळवून वरिष्ठ जरी झाला तरी तो अनारक्षित उच्चवर्णीय उमेदवाराला नेहमी कनिष्ठच राहणार असा जातीयवादी निकाल सर्वोच्च न्यायालयाने दिला.

१९९८ मध्ये पोस्ट ग्रॅज्युएट इन्जि. ऑफ मेडिकल एज्युकेशन अँड रिसर्च इन्टिट्यूट चंदीगड विरुद्ध फॅकल्टी असो.' या याचिकेत सर्वोच्च न्यायालयाने एकल पदांमधील आरक्षणाचे धोरण रद्द ठरविले. माऱ्याच्या जागांवर न्यायालयाने असा मारा केला.

संवैधानिक व मुलभूत हक्कात मोडणारे आरक्षण 'अजित सिंग जनुजा विरुद्ध पंजाब सरकार' या याचिकेत बेकायदेशीर ठरविण्यात आले. सवर्ण कर्मचाऱ्याची वरिष्ठता कायम ठेवण्याचा नियम पक्का करण्यात आला. आरक्षण धोरणाने नियुक्ती व पदोन्नती मिळविलेल्या अनुसूचित जाती व जमातीच्या उमेदवारांना नोकरीत अतिरिक्त ठरवून त्यांना कमी करण्याचे आदेश दिले गेले.

१९९९ साली प्रीती श्रीवास्तव विरुद्ध मध्यप्रदेश सरकार, या याचिकेत वैद्यकीय व अभियांत्रिकी विषयातील उच्च शिक्षणात आरक्षण हे राष्ट्र विघातक असल्याचे जातीद्वेषाने बरबटलेले मत सर्वोच्च न्यायालयाने नोंदवले.

असल्या अन्यायी प्रकारामुळे अनुसूचित जाती जमातीचे कर्मचारी, सामाजिक कार्यकर्ते व राजकारणातील सक्रिय मंडळी आरक्षणाच्या व पदोन्नतीतील आरक्षणाच्या समर्थनार्थ दंड थोपटून उभी ठाकली.

१९९५ ते २००१ दरम्यान अनुच्छेद १६(४अ) च्या संदर्भात ७७ वी, ८१ वी, ८२ वी आणि ८५ वी घटनादुरुस्ती करण्यात आली, ज्यामुळे पदोन्नतीमधील आरक्षणाचा विस्तार झाला. अनुच्छेद १६(४अ):अनुसूचित जाती आणि जमातीसाठी पदोन्नतीमध्ये आरक्षण देण्यासंबंधी ही दुरुस्ती होती. या दुरुस्तीमुळे पदोन्नतीमध्ये आरक्षणाच्या लाभासाठी ज्येष्ठतेची (लेपीशीशिपींळरश्र ीशपळीेंळीं) संकल्पना मांडण्यात आली, जी घटनेच्या अनुच्छेद १६(४अ) मध्ये जोडण्यात आली.

प्रीती श्रीवास्तव विरुद्ध मध्यप्रदेश सरकार, या प्रकरणातील सर्वोच्च न्यायालयाच्या निकालावर संसदेने भीमबाण डागला. भारतीय संविधानाची ९३ वी घटनादुरुस्ती, जी संविधान (९३ वी दुरुस्ती) कायदा, २००५ म्हणून ओळखली जाते, यानुसार खाजगी आणि सरकारी शिक्षण संस्थांमध्ये इतर मागासवर्गीयांना प्रवेश देण्यासाठी २७% आरक्षणाची तरतूद करण्यात आली. या दुरुस्तीने भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद १५ मध्ये कलम (५) जोडले, या उप-कलमामुळे केंद्र सरकारला आणि राज्य सरकारला सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या लोकांच्या (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि ओबीसी) प्रगतीसाठी, खाजगी शैक्षणिक संस्थांमध्येही प्रवेशासाठी विशेष तरतुदी करण्याचा अधिकार मिळाला. त्या काळात खाजगी शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेशासाठी आरक्षणाची कोणतीही व्यवस्था नव्हती. या दुरुस्तीद्वारे सरकारला या संस्थांमध्ये मागासलेल्या वर्गांसाठी प्रवेशाची सोय करणे शक्य झाले.

जी. नागराज विरुद्ध भारत सरकार (२००६) या प्रकरणात (च. छरसररिक्ष ीं. णपळेप `ष खपवळर), सर्वोच्च न्यायालयाने अनुसूचित जाती आणि जमातींच्या पदोन्नतीतील आरक्षणाची घटनात्मक वैधता तपासली. न्यायालयाने घटना दुरुस्त्या (७७,८१, ८२, आणि ८५) वैध ठरवल्या, पण हे आरक्षण देण्यासाठी सरकारला संबंधित समुदायांची 'अपर्याप्त प्रतिनिधित्व' आणि 'मागासलेपण सिद्ध करावे लागेल, असे आदेश दिले.

हे सर्व आपल्या अधिकाराप्रती जागृत असलेल्या सामाजिक, राजकीय व कर्मचारी संघटनांच्या रेट्यामुळे घडले. आपल्या अनुयायांना डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या हक्कासाठी सदैव सजग राहायला सांगितले. अश्रू, घाम व रक्ताचे सिंचन करून आंबेडकरी चळवळीने ज्या हक्कांची कमाई केली तिच्या रक्षणार्थ प्राणाची बाजी लावायला बाबासाहेबांनीच शिकवले. प्रत्यक्ष समरांगणात न उतरता लांब उभे राहून मजा पाहणार्यांना हे कसे कळणार? बाबासाहेब म्हणतात,

वरिष्ठ वर्गाची याचना करण्याचा दीनवाणा कारभार यापुढे आपण बंद केला पाहिजे आणि यापुढे कायद्याने दिलेले हक्क आम्ही प्राण गेला तरी बजावण्यासाठी तयार असले पाहिजे. आज महारांची वीस लाख वस्ती आहे. यातील अधिकार गाजविण्यासाठी एक लाख माणसे मेली तरी काय बिघडले ? मला म्हाताऱ्यांना सांगण्यापेक्षा तरुणांना सांगावयाचे आहे की तुम्ही आज न्याय्य हक्कांसाठी मरणाचे द्वारी जाण्यास तयार राहायला पाहिजे. (१४ मे १९३८ कणकवली सभा)

**– अॅड. आनंद गायकवाड**

## पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते अनुकंपा व सरळसेवा भरतीतील १६० उमेदवारांना नियुक्ती आदेश वितरणाचा भव्य कार्यक्रम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडून दिनांक १७ जुलै २०२५ रोजी अनुकंपा नियुक्तीचे सर्वसमावेशक सुधारित धोरण जाहीर करण्यात आले असून, मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या १५० दिवसांच्या कार्यक्रमांतर्गत अनुकंपा नियुक्ती व महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत लिपीक-टंकलेखक परीक्षा २०२३ च्या शिफारशीच्या अनुषंगाने उमेदवारांना नियुक्ती देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

या अनुषंगाने, सोलापूर जिल्ह्यातील गट-क व गट-ड मधील अनुकंपा तत्वावर तसेच एमपीएससीमार्फत सरळसेवा भरतीद्वारे नियुक्ती मिळवलेल्या एकूण १६० उमेदवारांना नियुक्ती आदेश प्रदान करण्याचा भव्य कार्यक्रम शनिवार, दि. ४ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालयाच्या बाजूला, विजापूर रोड, सात रस्ता, सोलापूर येथे आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमास पालकमंत्री जयकुमार गोरे हे उपस्थित राहून सर्व उमेदवारांना नियुक्ती आदेश वितरित करणार आहेत.

कार्यक्रमाच्या पूर्वतयारीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयाकडून नियुक्ती आदेश प्राप्त उमेदवारांना दिनांक ३ ऑक्टोबर रोजी सकाळी ९.०० वाजता जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात उपस्थित राहण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच सर्व संबंधित कार्यालय प्रमुख व नियुक्ती प्राधिकारी यांनी विहीत नमुन्यातील मूळ नियुक्ती आदेश दिनांक ३ ऑक्टोबर रोजी सकाळी ११.०० वाजता समक्ष सादर करण्यात आलेले आहेत.

तरी जिल्हा प्रशासनाच्या वतीने सर्व उमेदवारांना वेळेत उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

## स्व. सुधाकरपंत परिचारक यांच्या जयंतीनिमित्त वक्तृत्व स्पर्धा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी

स्वर्गीय सुधारपंथ परिचारक यांच्या जयंतीनिमित्त राज्यस्तरीय वापरतो स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत महाराष्ट्रातील विविध महाविद्यालयातील विद्यार्थी विद्यार्थिनींनी सहभाग नोंदवला होता सदर वक्तृत्व स्पर्धा मुंबई शिक्षण समूहाच्या पानात आयोजित करण्यात आली होती.



अश्विन शुद्ध अष्टमी अर्थात दुर्गाष्टमी श्रद्धेय स्वर्गीय सुधाकरपंत परिचारक यांच्या ९० व्या जयंतीनिमित्त उमा शिक्षण संपला मध्ये दरवर्षीप्रमाणे राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा आयोजित केल्या होत्या महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातून अनेक महाविद्यालयातील विद्यार्थिनी सहभाग नोंदवाला या स्पर्धेत परीक्षक म्हणून सर्वश्री मंदार केसकर, प्रताप चव्हाण, दीपक इरकल डॉ. प्रशांत ठाकरे यांची नेमणूक करण्यात आली होती त्याच बरोबर परीक्षकांच्या हस्ते अभिनव या स्वर्गीय मोठ्या मालकाच्या जीवनावर आधारित भित्तिपत्रिकाची प्रकाशाने करण्यात आले तसेच बहुसंख्य विद्यार्थ्यांनी सखोल अभ्यासपूर्ण आपल्या विषयाची मांडणी आपल्या वक्तृत्वातून केली.

यावेळी संस्थेची ज्येष्ठ सदस्य मार्गदर्शक मुकुंद परिचारक, डॉ. मिलिंद परिचारक, राजगोपाल भट्ट रमेश लाड, हे उपस्थित होते तसेच पारितोषिक वितरण युवक नेते अँड प्रणव परिचारक, प्राचार्य धीरज कुमार बाड, यांच्यासहित सर्व प्राध्यापक वृंद विद्यार्थी ही उपस्थित होते.

## पालखेडला विद्यालयात आपल्या संविधानाची ७५ वी कार्यक्रम साजरा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड /प्रतिनिधी : तालुक्यातील महाराष्ट्र शिक्षण संस्थेचे न्यू इंग्लिश स्कूल,पालखेड विद्यालयात अनुगामी लोकराज्य महाभियान संस्था,मुंबई अंतर्गत व्याख्याते लक्ष्मीकांत होळकर यांचे आपल्या संविधानाची ७५ वी या विषयावर विद्यालयात व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

यावेळी व्याख्याते लक्ष्मीकांत होळकर यांनी संविधानाची वाटचाल, नागरिकांचे मूलभूत अधिकार व कर्तव्य, विकास कार्यात नागरिकांचा लोकसहभाग, समाजातील सर्व दुर्बल घटकांचे संरक्षण,आपल्या भारताची कायम प्रामाणिक राहतील असे नागरिक संविधानामार्फत घडणे, राष्ट्रीय एकता व एकात्मता,सामाजिक वातावरणातील प्राविण्य राखून अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे महत्त्व यांसह सरकार व शासन यांमधील दुवा असलेल्या सदर संस्थेचे कामकाज आणि संविधानाबद्दल विस्तृत माहिती व्याख्यानातून उपस्थितांना दिली.

याप्रसंगी अनुगामी लोकराज्य महाभियानाचे निफाड तालुका भाग जनसेवक सुरज लबडे, स्थानिक प्रतिनिधी किरण कोकाटे, किशोर जाधव, मुख्याध्यापक अशोक शेळके आदी मान्यवर व्यासपीठावर होते.

यावेळी 'मला उमगलेले संविधान' या विषयावर विद्यार्थ्यांची प्रश्नमंजुषा चाचणी घेण्यात आली.

याप्रसंगी मुख्याध्यापक अशोक शेळके,निलेश गवांदे, दीपक देशमुख, हेमंतकुमार होलगडे, सुनंदा दुर्धवळे ,संजय लव्हांगडे, मंगेश कागदे, शैलेश शिखरे, किरण थेटे,राहुल दवते,वैशाली मोते,सागर जाधव,राजेंद्र नाठे, संदीप आहेर, दत्तात्रय पगार, सावन जाधव,संजय कोकतरे, कविता ढोमसे,सारिका पवळे,सुरेश गांगुर्डे, रामदास पवार,नदीम तांबोळी आदींसह विद्यार्थी उपस्थित होते,सदर कार्यक्रमाचे आभार संजय लव्हांगडे यांनी मानले.

## सांगोला विधानसभा मतदारसंघाचे आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांच्याकडून अतिवृष्टी व पूरग्रस्तांसाठी १ महिन्याचे वेतन मदत मुख्यमंत्र्यांना सुपूर्द

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्रात गेल्या काही दिवसांत झालेल्या अतिवृष्टी व पूर परिस्थितीमुळे विशेषतः मराठवाडा व विदर्भासह सोलापूर जिल्ह्यातील सांगोला तालुक्यातील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अशा आपत्तीग्रस्तांना दिलासा देण्यासाठी सांगोला विधानसभा मतदारसंघाचे आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी आज मुंबई येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मुख्यमंत्री सहायता निधीत १ महिन्याचे वेतन दिले आहे. हे पैसे अतिवृष्टी व पूरग्रस्तांच्या पुनर्वसन व मदतीसाठी वापरले जातील, असे आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी सांगितले.

महाराष्ट्रात सप्टेंबर महिन्यात मुसळधार पावसाने हाहाकार माजवला आहे. मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यांत शेतजमिनी पाण्याखाली गेल्या असून, घरे उध्वस्त झाली आहेत. सांगोला तालुक्यातही अतिवृष्टी मुळे बरीच गावे प्रभावित झाली आहेत. शेतकऱ्यांचे पिके नष्ट झाले असून, पशुधनाला मोठा फटका बसला आहे. यामुळे शासनाने अतिवृष्टीग्रस्तांसाठी तातडीची मदत जाहीर केली असून, मृत्यू झालेल्यांच्या वारसांना ४ लाख रुपयांपर्यंत अनुदान देण्याचा निर्णय घेतला आहे.

अशा संकटकाळात आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी सामाजिक जबाबदारीची जाण ठेवत मुख्यमंत्री सहायता निधीत वाटा उचलला.यावेळी बोलताना आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख म्हणाले, सांगोला तालुक्यातील शेतकरी व पूरग्रस्त कुटुंबां सोबत मी नेहमीच असतो. ही अतिवृष्टी ही नैसर्गिक आपत्ती असली तरी त्याचा सामना एकत्रितपणे करायचा आहे. मुख्यमंत्री सहायता निधीत दिलेले हे वेतन पूरग्रस्तांच्या घरपुनर्रचना व शेती पुनर्वसनासाठी उपयुक्त ठरतील. तसेच त्यांनी स्थानिक प्रशासनाला तात्काळ मदत पोहोचवण्याचे निर्देश दिलेले आहेत.

मुख्यमंत्री सहायता निधी हा राज्यातील विविध आपत्ती व सामाजिक मदतीसाठी वापरला जाणारा महत्त्वाचा निधी आहे. गेल्या काही वर्षांत या निधीतून कोविड, पूर व दुष्काळग्रस्तांना मोठ्या प्रमाणात मदत करण्यात आली आहे. आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांच्या या निर्णयाने स्थानिक शेतकरी व नागरिकांनी स्वागत केले असून,हे



योगदान सांगोला मतदारसंघातील प्रत्येकापर्यंत पोहोचेल असे मत व्यक्त केले आहे. या मदतीमुळे सांगोला तालुक्यातील पूरग्रस्तांना दिलासा मिळेल. शासनाने अतिवृष्टी नुकसान भरपाईसाठी विविध कागदपत्रांची यादी जाहीर केली असून, शेतकऱ्यांनी त्वरित अर्ज करावेत, असे आवाहन आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी केले आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# सांगोला साखर कारखान्याचे ४लाख गाळप उद्दिष्ट :आ. अभिजीत पाटील

## सांगोला कारखान्यामुळे विठ्ठल कारखाना व विधानसभेच्या यशामध्ये मोठा वाटा : आमदार अभिजीत पाटील

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : सांगोला तालुक्यातील वाकी शिवणे येथील धाराशिव साखर कारखाना संचलित सांगोला शेतकरी सहकारी साखर कारखान्याचा ११वा बॉयलर अग्निप्रदिपन सोहळा संत तुकाराम महाराजांचे वंशज हभप बापूसाहेब देहूकर महाराज यांच्या शुभहस्ते पार पडला. यावेळी होमहवन पूजा सौ.शितल व महादेव उत्तम देठे (धोंडेवाडी) आणि सौ.दिपाली राहुल कांतीलाल हादगिणे (जैनवाडी) या दांपत्यांच्या उपस्थितीत संपन्न झाली.

यावेळी प्रा.तुकाराम मस्के यांनी आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले की; एक सर्वसामान्य कुटुंबातील तरुण बंद पडलेले साखर कारखाने अनेक जिल्ह्यांमध्ये जाऊन सुरू करतो, पुन्हा तो चेअरमन होतो, शेतकऱ्याचे पोरगं थेट जनतेच्या आर्शीवादाने आमदार झाले असून हि किमया फक्त आमदार पाटील यांच्या माणुसकीने कमावलेल्या माणसांमुळे आहे. अनेक संस्थांमधील शेतकरी सभासद, कामगार, वाहतूक ठेकेदार यांचे आशीर्वाद मिळाले आहेत.

यावेळी बापूसाहेब देहूकर महाराज म्हणाले की; अगदी कमी काळामध्ये अभिजीत आबा पाटील यांनी आपल्या कार्याचा आलेख चढता असून सर्व समाजातील लोकांना एकत्र घेऊन प्रगतीच्या दिशेने वाटचाल करत आहेत. माणसाने विश्वास संपादन केला की यश आपोआप मिळतं याचे उत्तम उदाहरण म्हणजे आमदार अभिजीत पाटील असल्याचे देहूकर महाराज यांनी सांगितले.

यावेळी माढ्याचे आमदार बोलताना म्हणाले की; सांगोला साखर कारखाना सुरू करत असताना अनेक संकट आली परंतू त्यातून मार्ग काढत गाळप यशस्वी केले. सांगोला साखर कारखान्याचे नाव पुन्हा एकदा नावारूपाला आणण्यासाठी संपूर्ण संचालक मंडळ काम करत आहे. सांगोला कारखान्यामुळे विठ्ठल कारखाना व विधानसभेच्या यशामध्ये मोठा वाटा असल्याचे सांगितले. कारखाना चालवताना असताना सर्व संचालक मंडळाची व अधिकाऱ्यांची प्रामाणिक भावना आहे. सन २०२५–२६च्या गाळपपासाठी कारखान्याची कामे पूर्ण झाली





आहेत. यंदा कारखान्याचे ४ लाख गाळपाचे उद्दिष्ट असून शेतकरी सभासदांनी सहकार्य करण्याचे आवाहन आमदार अभिजीत पाटील यांनी सांगितले. येत्या दिवाळी सणासाठी कामगारांना १५ दिवसाचा बोनस म्हणून बक्षीस आमदार पाटील यांनी जाहीर केले असून दिवाळी सणाच्या शुभेच्छा दिल्या.

यावेळी प्रस्ताविक नितीन पवार यांनी केले असून धाराशिव साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक अमर पाटील यांनी कार्यक्रमात आभार मानले.

यावेळी सांगोला साखर कारखान्याचे व्हा.चेअरमन विश्वनाथ चव्हाण, शहाजी नलवडे, तुकाराम जाधव, सदाशिव नवले, धाराशिव साखर कारखान्याचे संचालक भागवत चौगुले, संतोष कांबळे, रणजित भोसले, संदीप खारे, संजय खरात, सुरेश सावंत, विकास काळे, सुहास शिंदे यासह आदी मान्यवर उपस्थित होते.

# नळदुर्ग येथे धम्म चक्र प्रवर्तन दिनाच्या निमित्ताने धम्मरॅलीचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस.के.गायकवाड : धम्मचक्र अनुप्रवर्तन दिनाच्या ६८ व्या वर्धापन दिनानिमित्ताने नळदुर्ग तालुका तुळजापूर येथे भव्य आणि दिव्य असी शहरातून धम्म संदेश रॅली काढण्यात आली.

या रॅलीची सांगता नालंदा बुद्ध विहार भीम नगर नळदुर्ग येथे करण्यात आली यावेळी धम्म देशना देताना भन्ते संघानंद म्हणाले की तथागत भगवान गौतम बुद्ध यांनी संपूर्ण जगाला मानवतेची शिकवण दिली असून तें एक मार्गदाता होते.मानव कितीही शत्रू असला तरी त्या मानवाला करुणेने जिंकता येते असा संदेश तथागत भगवान बुद्ध देतात.बुद्धाची शिकवण उदारमतवादी होती.लोकशाहीवादी होती बुद्धाने कधीही दुसऱ्या माणसाच्या विचार स्वतंत्र्यात हस्तक्षेप केला नाही.स्वातंत्र्य विचार हा प्रत्येक व्यक्तीचा जन्म सिद्ध हक्क आहे.

बुद्ध स्वतःला एक मानवी शिक्षक मानत होते. मानवाने विवेक बुद्धीने विवेकी माणसाशी कुशल कर्तव्य केल्यास मानवाला आनंदी व कल्याणकारी मार्ग मिळतो आणि त्याचा उपयोग ज्ञान मिळविण्यासाठी होतो .बुद्धांनी केवळ अंधश्रद्धा आणि सर्व शक्तिमान अधभूत शक्तीच्या भीतीला पराभव केले असून यज्ञ कर्मकांड आणि धार्मिक विधीमुळे मानवाच्या कोणत्याही इच्छा पूर्ण होत नाहीत.यासाठी प्रत्येक मानवाने जनकल्याणकारी अष्टांगिक मार्गाचा अवलंब केल्यास समाजातील प्रत्येक मानवाचे जीवन समृद्ध होईल असे परखड मत सोलापूर येथून आलेले पूज्य भन्ते संघानंद यांनी केले. नळदुर्ग शहरात नुकतच धम्मचक्र प्रवर्तन अशोका विजया दशमीचे औचित्य साधून बौद्ध धम्माचा प्रसार आणि प्रचारासाठी शहरातून तथागत भगवान गौतम बुद्धाच्या मूर्तीसह धम्म रॅली काढण्यात आली.





यावेळी पुज्य भन्ते शासनसुरी व पुज्य भन्ते अंगुलीमाल यांनी ही धम्म देसना दिली.

प्रारंभी तथागत भगवान गौतम बुद्ध व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेच पुजन नालंदा बुद्ध विहार मंडळाचे अध्यक्ष प्रा.शिवाजी बनसोडे , सेक्रेटरी बाबुराव बनसोडे यांच्या हस्ते करण्यात आले व पंचशिल ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले यावेळी समता सैनिक दलाच्या सैनिकांनी पंचशिल ध्वज व भन्तेना मानवंदना दिली भन्ते संघानंद भन्ते शासनसुरी भन्ते अंगुलीमाल आदीनी सर्व उपस्थित बौद्ध उपासक व उपासिकाना त्रिशरण पंचशिल दिले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक रिपाइंचे जिल्हा उपाध्यक्ष बाबासाहेब बनसोडे यांनी केले. यावेळी रिपाइंचे जिल्हा सचिव एस के गायकवाड, प्रा.नागनाथ गायकवाड, सामाजिक कार्यकर्ते प्रमोद कांबळे आदिनी आपपले मनोगत व्यक्त केले.

यावेळी माजी सैनिक पद्माकर पुजारी यांचे पुत्र पोलिस निरीक्षक राजकुमार पुजारी सहाय्यक पोलिस निरीक्षक प्रितकुमार पुजारी, मधुसुदन दुरुगकर, लक्ष्मीताई पुजारी, विद्याताई पुजारी, कोमलताई पुजारी, उषाताई दुरुगकर यांच्या कडुन समाजास तथागत भगवान गौतम बुद्धांची प्रदिप्त मुर्ती दान दिल्याने त्या मुर्तीची धम्मरॅली काढून मुर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली.

यामुळे पुजारी परिवाराचा माजी मुख्याध्यापक स्मृतिशेष सदाशिवराव बागडे गुरुजी प्रतिष्ठानच्या वतीने अजयकुमार बागडे यांनी सत्कार केला .व रुपाली मनोजकुमार बनसोडे ही सेट परिक्षा उत्तीर्ण झाल्यामुळे बागडे परिवाराकडून सत्कार करण्यात आला.यावेळी धम्मरॅली कमेटी अध्यक्ष रुषीकेश कांबळे यांचा ही सत्कार करण्यात आला. नळदुर्ग शहरातून धम्म रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. ही धम्म रॅली कसाई गल्ली, किल्ला गेट, क्रांती चौक, चावडी चौक, शास्त्री चौक अहिल्यामाई होळकर चौक,नविपेठ मार्गे डॉ.बाबासाहेब आंबेडकर संविधान चौक अक्कलकोट रोड बुद्धनगर, डॉ आंबेडकर नगर मार्गे बुद्ध विहारा समोर सांगता करण्यात आली.समता सैनिक दलाचे जवान राजरत्न बनसोडे यांनी लेझीम पथकाच्या संगीतावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची खुप छान गीते गायली आणि मिरवणूकीचे राजरत्न बनसोडे अकर्षण ठरले.

यावेळी डॉ आंबेडकर इंटर नॅशनल इंग्लिश मिडीयमचे स्कुलचे मुख्य प्रवर्तक तथा रिपाइंचे शहराध्यक्ष मारुती खारवे, माजी नगरसेवक किशोर बनसोडे, रिपाइंचे मराठवाडा सदस्य दुर्वास बनसोडे, पत्रकार सुनिल बनसोडे, योगेश सुरवसे, भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हा कोषाध्यक्ष कुमार ढेपे, योगेश दुरुगकर, गणेश दुरुगकर प्रा. भगवान चिमणे, प्रा डॉ.पी. एस. गायकवाड, सचिन कांबळे, गौतम वाघमारे, सत्याशिल नळदुर्गकर,माजी नगर सेविका विमलताई बनसोडे, सुशिलाताई गायकवाड, राजरत्न बनसोडे, अतुल बनसोडे, अमर बनसोडे सह लेझीम संघाचे सर्व,सदस्य महिला बौद्ध उपासक व उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार बौध्दाचार्य तथा पत्रकार दादासाहेब बनसोडे यांनी केले.

# सैनिक टाकळीवाडी येथे अमर जवान स्मारक, सैनिक हॉल, सैनिक प्रवेशद्वाराचा उद्घाटन सोहळा मोठ्या उत्साहात



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

टाकळीवाडी/प्रतिनिधी : सैनिक टाकळीवाडी तालुका शिरोळ येथे सैनिक वेल्फेअर असोसिएशन टाकळीवाडी यांच्यावतीने उभारलेल्या शौर्य, त्याग, बलिदान आणि विजयाचे प्रतीक असलेल्या अमर जवान स्मारक सैनिक हॉल व सैनिक प्रवेशद्वाराचा उद्घाटन सोहळा ५ ऑक्टोबर रोजी प्रमुख पाहुणे मा. आमदार राजेंद्र पाटील यड्रावकर (माजी आरोग्य मंत्री) व कार्यक्रमाचे अध्यक्ष मा.सूर्यकांत मलकारी बदामे यांच्या हस्ते संपन्न झाला.

कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलन व छत्रपती राजश्री शाहू महाराज, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर,छत्रपती शिवाजी महाराज यांना पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात झाली.

माजी सैनिकांच्या हॉलसाठी श्री गुरुदत्त शुगर्स लि. टाकळीवाडी एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर राहुल घाटगे दादा यांचे मोठे मोलाचे योगदान लाभले.

या कार्यक्रमाची प्रस्तावना ऑनररी कॅप्टन रमेश निर्मळे संस्थापक सैनिक वेल्फेअर असोसिएशन यांनी केली.

आमदार बोलताना म्हणाले की सैनिक टाकळीवाडी गाव हे सैनिकांचे गाव म्हणून प्रसिद्ध आहे. जास्तीत जास्त मुलांनी सैन्य भरती व्हावे. त्यासाठी लागेल ती मदत, सैन्य भरतीपूर्व प्रशिक्षण यासाठी मदत करण्याचे आश्वासन दिले.

यावेळी प्रमुख उपस्थिती कर्नल विलास सुळकोडे (इ.सी. एच.एस अधिकारी), संजय माने (जिल्हा अध्यक्ष सैनिक फेडरेशन कोल्हापूर), विजय पाटील (उपाध्यक्ष पश्चिम महाराष्ट्र सैनिक फेडरेशन कोल्हापूर), मंगल बिरणगे( सरपंच टाकळीवाडी), नंदकुमार निर्मळे ( ग्रामविकास अधिकारी), तसेच गावातील उपसरपंच सर्व सदस्य, आजी–माजी सैनिक, संघटनेचे सर्व पदाधिकारी, समस्त गावकरी, श्री गुरुदत्त शुगर्स लि. टाकळीवाडी चे डायरेक्टर तसेच ज्येष्ठ पत्रकार दगडू माने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे आभार केंदबा कांबळे माजी सुभेदार विद्यमान महात्मा गांधी तंटामुक्त अध्यक्ष यांनी केले.



# सतेजराजे यांनी बहारदार लेझीम खेळत मिरवणुकीत आणली रंगत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी

धम्म चक्र परिवर्तन दिनानिमित्त सोलापुरात निघालेल्या मिरवणुकीत बॉबी ग्रुप च्या लेझीम ताफ्यात सोलापुर येथील वरिष्ठ पत्रकार महेश गायकवाड यांचे जिवलग नातू सतेज राजे गायकवाड यांनी बहारदार लेझीम खेळत मिरवणुकीत रंगत आणली सतेज राजे यांचे काका सुयश महेश गायकवाड आणि त्यांच्या मित्रांसमवेत दियेश तसेच रोशन सानी अभी डोळसे यांच्या समवेत सतेज राजे यांनी लेझीम खेळ खेळला.

डॉ बाबासाहेब आंबेडकर उद्यान येथून मान्यवरांच्या उपस्थितीत लेझीम ताफा मिरवणुकीचा शुभारंभ करण्यात आला या वेळी सतेज राजे गायकवाड याने बहारदार लेझीम खेळत मिरवणुकीत सहभागी झाला आणि खेळत खेळत त्याने लेझीम ताफ्यात रंगत आणली. सोलापुरात प्रचंड मोठा जल्लोषात धम्म चक्र परिवर्तन दिनानिमित्त शहतातील विविध भागा मधून मोठ्या प्रमाणात विविध मंडळाच्या मिरवणुका निघाल्या काढण्यात आल्या होत्या. सोलापुरात डॉल्बी वीना या जबरदस्त मिरवणुका झांज पथक ढोले बाजा लेझिम ताफ यांच्या गजरात निघाल्या आहेत अनेक नामवंत मंडळाच्या देखावा सह मिरवणुका दुपारी सुरू झाल्या भारतीय बौद्ध महासभेचा रथ मिरवणुकीत सर्वात पुढे होता. यानंतर अनेक मंडळानी बहारदार लेझिम खेळ दाखवत मिरवणुका काढल्या होत्या या सर्व मिरवणुका डॉ बाबासाहेब आंबेडकर उद्यान येथून प्रारंभ होऊन डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक येथील महा मानव डॉ बाबासाहेब आंबेडकर पुतळा जवळ विसर्जित करण्यात आल्या.

बाबासाहेब आंबेडकर उद्यान जवळ बॉबी ग्रुप आनंद बौद्ध मंडळ रामजी तरुण मंडळ महाबोधी लेझिम संघ यांच्या मिरवणुका जबरदस्त खेळ खेळत काढण्यात आल्या होत्या बॉबी ग्रुप च्या लेझीम ताफ्यात लहान बालक आणि सोलापुरातील वरिष्ठ पत्रकार महेश गायकवाड यांचा जिवलग नातू सतेज शंकर गायकवाड हा उत्साहात सहभागी झाला होता त्याने बहारदार लेझीम खेळात मिरवणुकीत रंगत आणली यामुळे बॉबी ग्रुप चे संस्थापक अध्यक्ष नगरसेवक अजित भाऊ गायकवाड आणि नगरसेविका वंदनाताई गायकवाड यांनी सतेज राजे याचे कौतुक केले.

# स्तंभलेखक प्रवीण बागडे यांना मातृशोक



नागपूर : प्रसिद्ध स्तंभलेखक आणि समाजाभिमुख विचारवंत प्रवीण बागडे यांना मातृशोक झाला आहे. त्यांच्या मातोश्री नवयुग/पं. बच्चराज व्यास विद्यालयातील सेवानिवृत्त शिक्षिका बुद्धवासी शालीनी मोरेश्वर बागडे वय वर्षे ७८ यांचे ०२ ऑक्टोबर २०२५ रोजी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांचा अंत्यसंस्कार नारा दहन घाट, जरीपटका, नागपूर येथे करण्यात आला. त्यांच्या मागे मुलगा ललित, प्रवीण, आणि नितीन (बालू) तसेच बराच मोठा आप्त परिवार आहे. या प्रसंगी विविध क्षेत्रातील मान्यवरांनी बागडे कुटुंबियांप्रती संवेदना व्यक्त केल्या आहेत. साहित्य, समाजकारण आणि जनजागरण क्षेत्रात आपल्या लेखणीद्वारे महत्वाचे योगदान देणारे प्रवीण बागडे यांना मिळालेला हा वैयक्तिक आघात अतिशय वेदनादायी आहे. त्यांच्या मातोश्रींच्या निधनाने समाजातील एक प्रेमळ, मार्गदर्शक व्यक्तिमत्त्व हरपल्याची भावना व्यक्त होत आहे. त्यांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी कधीही भरून येणार नाही, परंतु त्यांच्या मुलांमार्फत केलेले कार्य हेच त्यांचे खरे स्मारक ठरेल. या दुःखद प्रसंगामुळे बागडे कुटुंबीयांवर शोककळा पसरली आहे.

**कल्याणशेट्टी महाविद्यालयात महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती निमित्त कार्यक्रम**

**रुपाली शहा यांचे प्रतिपादन**

# महात्मा गांधी यांचा स्वदेशीचा संदेश युवकांनी आत्मसात करावा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी /अक्कलकोट : महात्मा गांधीजींनी परदेशी मालावर बहिष्कार घातला, स्वदेशी मालाचा पुरस्कार केला. लालबहादूर शास्त्री यांनी जय जवान जय किसान चा नारा दिला. त्यामुळे स्वतंत्र भारताची मजबूत उभारणी झाली. त्यांचा आदर्श घेऊन युवकांनी स्वदेशीचा संदेश आत्मसात केला पाहिजे असे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्त्या रूपाली शहा यांनी व्यक्त केले.

### युवा महोत्सवातील कलाकाराकडून अभिवादन

**विद्यापीठ युवा महोत्सवाच्या निमित्ताने सरावासाठी उपस्थित असलेल्या कलाकारांनी महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेस अभिवादन केले त्यांचे रूपाली शहा यांनी विशेष कौतुक केले.**

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील मराठी वांग्मय मंडळ व राष्ट्रीय सेवा योजना विभाग संयुक्त विद्यमाने महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी विभाग प्रमुख प्रा भीम सोनकांबळे, प्रा मनीषा शिंदे उपस्थित होते.

पुढे ते म्हणाले की, व्यापाराच्या निमित्ताने आलेल्या ब्रिटिशांनी आपल्या देशात मसाल्याचे पदार्थ विदेशी कापड तसेच इतर वस्तूंची विक्री केली. त्याविरुद्ध महात्मा गांधी यांनी आंदोलन केले. आंदोलनासाठी त्यांनी शांततेचा मार्ग स्वीकारला. स्वतंत्र, समता,बंधुता सत्याग्रह तत्वांचा पुरस्कार केला त्यामुळे देशाला स्वातंत्र्य मिळाले. त्यांच्या तत्वाचे आपण वारसदार आहोत हे युवकांनी विसरू नये.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा भीम सोनकांबळे यांनी केले. तर आभार प्रा मनीषा शिंदे यांनी मानले.




संस्थेचे अध्यक्ष आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी, संचालिका शांभवीताई कल्याणशेट्टी, ज्येष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, सचिव मल्लिकार्जुन मसुती, प्राचार्य डॉ एस आर लोखंडे, जूनियर विभाग प्रमुख पुनम कोकळगी, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी यांनी उपक्रमाबद्दल अभिनंदन केले.

# आषाढी यात्रेप्रमाणे कार्तिकी यात्रेत भाविकांना सोई सुविधा

## सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर; २६ ऑक्टोंबरपासून २४ तास दर्शन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/पंढरपूर : कार्तिकी शुध्द एकादशी रविवार दि. ०२ नोव्हेंबर, २०२५ रोजी असून, यात्रा कालावधी दि.२२ ऑक्टो. ते ०५ नोव्हें. असा राहणार आहे. या यात्रा कालावधीत सुमारे आठ ते दहा लाख भाविक श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी येतात. येणाऱ्या वारकरी, भाविकांना मंदिर समितीकडून आषाढी यात्रेप्रमाणेच आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली.

कार्तिकी यात्रा पूर्व नियोजनाबाबत मंदिर समितीची बैठक श्री विठ्ठल रुक्मिणी भक्त निवास येथे संपन्न झाली. बैठकीस सदस्या शकुंतलाताई नडगिरे, डॉ.दिनेशकुमार कदम, संभाजी शिंदे, ह.भ.प.ज्ञानेश्वर देशमुख (जळगांवकर), ड. माधवी निगडे, ह.भ.प.प्रकाश जवंजाळ, ह.भ.प.शिवाजीराव मोरे, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, प्रभारी व्यवस्थापक पृथ्वीराज राऊत तसेच पुरातत्व विभागाचे डॉ.विलास वाहणे, कार्यकारी अभियंता श्रीनिवास गुजरे, वास्तुविशारद तेजस्विनी आफळे,

### मंदिर जतन व संवर्धन कामाबाबत विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली बैठक

जतन संवर्धन कामाचे ठेकेदार तसेच सर्व खाते प्रमुख उपस्थित होते.

यावेळी मंदिर समितीचे सहअध्यक्ष औसेकर महाराज म्हणाले, रविवार दि २ नोव्हेंबर रोजी पहाटे २.२० वाजता राज्याचे उपमुख्यमंत्री महोदय व मानाचे वारकरी यांचे शुभहस्ते सपत्नीक श्रीची शासकीय महापुजा संपन्न होणार आहे. या यात्रा कालावधीत वारकरी भाविकांना श्री विठ्ठल रुक्मिणी मातीचे सुरळीत व सुलभ दर्शन व्हावे यासाठी परंपरेनुसार दि.२६ ऑक्टोंबर पासून २४ तास दर्शन उपलब्ध करण्यात येणार आहे. तसेच मंदिर जतन-संवर्धन कामाबाबत विभागीय आयुक्त पुणे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात येणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी बैठकीत कार्तिकी एकादशीला राज्याचे उपमुख्यमंत्री यांच्या हस्ते श्रींची शासकीय महा-पूजा करण्याची प्रथा आहे. परंतू, राज्याच्या मंत्रिमंडळात सध्या दोन उपमुख्यमंत्री असल्याने कोणत्या मान्यवरांच्या हस्ते पूजा करावी याबाबत शासनाकडून मार्गदर्शन मागविणे, तसेच दि. २६ ऑक्टोंबर ते ०९ नोव्हेंबर या कालावधीत २४ तास दर्शन उपलब्ध करून देणे. तसेच श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर व परिवार देवता मंदिराचे जतन-संवर्धन कामाच्या अनुषंगाने विभागीय आयुक्त, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करणे, प्रस्तावित पंढरपूर विकास आराखड्यामध्ये मुखदर्शनरांग, प्रशासकीय कार्यालय, अन्नछत्र व इतर अनुषंगीक सोई सुविधा उपलब्ध करून देणेबाबत जिल्हाधिकारी यांना प्रस्ताव देणे, कम्युनिटी रेडीओ केंद्र स्थापन करण्यासाठी ४ कोटी रुपये इतका निधी उपलब्ध करून देणेबाबत शासनास प्रस्ताव देणे, एमटीडीसी भक्तनिवासाचा करारनामा वाढवून घेणेबाबत शासनास प्रस्ताव देणे इत्यादी निर्णय घेण्यात आल्याचे सांगीतले. तसेच कार्तिकी यात्रेला भाविकांना देण्यात येणा-या सोई सुविधांचा आढावा घेण्यात आला.

# सोलापूर सहाय्यक कामगार आयुक्त यलगुंडे यांच्या बदलीची कामगारांमधून मागणी






**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर (प्रतिनिधी) : सोलापूर सहाय्यक कामगार आयुक्त निलेश येलगुंडे यांच्या बदलीची अनेक बांधकाम कामगारांमधून मागणी होत असल्याचे दिसून येत आहे सोलापूर जिल्ह्यातील अकरा तालुक्यांमध्ये कामगारांच्या सलुभ सोयीकरता तालुका निहाय कामगार केंद्रे करण्यात आली आहेत परंतु सोलापूर सहा कामगार आयुक्त प्रभारी पद येलगुंडे यांच्याकडे आल्यापासून निलेश येलगुंडे यांनी खऱ्या बांधकाम कामगारांना जाचक नियम अटी लावून नाहक त्रास देत असल्याचे बोलले जात आहे.

तसेच जे खरे बांधकाम कामगार नाहीत त्यांची कामे मात्र एलगुंडे हे एजंटांमार्फत अगदी सुलभ रित्या तात्काळ करून देत असल्याचे दिसूत येत आहे तर अनेक बांधकाम कामगारांना महाराष्ट्र सरकारकडून सेफ्टी किट सेट तसेच भांडीसंच या वस्तु मोफत दिल्या जातात परंतु कामगार आयुक्त कार्यालयाशी जोडले गेलेले अनेक एजंट हे या मोफत दिल्या जाणाऱ्या योजनांसाठी बांधकाम कामगारांकडून पैसे घेत असल्याच्या अनेक तक्रारी येत आहेत त्यामुळे सोलापूर सहाय्यक कामगार प्रभारी आयुक्तपदी असलेले येलगुंडेवार यांची लवकरात लवकर बदली करण्याची मागणी बांधकाम कामगार वर्गातून होत आहे. या अगोदरही निलेश यलगुंडे हे सोलापूर कामगार आयुक्त म्हणून काही वर्षे सोलापूर जिल्ह्यात ठाण मांडून बसले होते परंतु बांधकाम कामगार संघटनांकडून निलेश यलगुंडे यांनी कशा प्रकारे कोट्यावधी रुपयांचा भ्रष्टाचार केला व शासणाचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान करून जे खरे बांधकाम कामगार आहेत त्यांना शासकीय योजनांपासून दूर ठेवले व आपल्या आर्थिक फायद्यासाठी जे बांधकाम कामगार नाहीत नाहीत. त्यांना तात्काळ लाभ देण्याचे काम केले गेले होते त्यामुळे येलगुंडे यांची सोलापूर कामगार आयुक्त पदावरून उचल बांगडी करण्यात आली होती परंतु पुन्हा सोलापूर कामगार आयुक्त पदाचा प्रभारी पदभार कोणाच्या आशीर्वादाने यलगुंडे यांना दिला गेला हा प्रश्न बांधकाम कामगार वर्गातून विचारला जात आहे.

केंद्रात आणि राज्यात भाजप सरकार असून या सरकारने किंबहुना भाजपने असा नारा दिला होता की ना खाऊंगा ना खाने दूंगा परंतु अशा प्रकारे भ्रष्टाचाराचे अनेक आरोप असताना तुम्ही पुन्हा पुन्हा त्याच व्यक्तीकडे त्याच जिल्ह्याच्या पदाचा पदाभार देत आहात तर सर्वसामान्य जनतेने याचा नेमका अर्थ तरी काय समजायचा त्यामुळे सोलापूर जिल्हा पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी याबाबत गांभीर्य दाखवत बांधकाम कामगारांना योग्य तो न्याय देण्याची मागणी बांधकाम कामगारांमधून होत आहे अन्यथा कामगार संघटना राज्यभर रस्त्यावर उतरुन आंदोलनाचा तीव्र पविञा घेतील तसेच या अगोदरही निलेश यलगुंडे यांनी सहाय्यक कामगार आयुक्त सोलापूर कार्यालयात अटल बांधकाम कामगार आवास योजनेअंतर्गत प्रस्ताव आणि नोंदणी, नुतणीकरण व विविध योजनेअंतर्गत अर्ज न स्विकारणे, स्विकारलेले अर्ज दोन वर्षापेक्षा जास्त काळापासून प्रलंबित ठेवणे, तपासणी न करणे, शासन अनुदान रकमेचे वाटप न करणे लिपीक किर्ती देऊळकर, टी. डी. शेख, महेश लिंबोळे यांचेकडून रकमेची मागणी करणे अशा इत्यादी तक्रारी त्यांच्याबाबत प्राप्त झाल्यानंतर त्यांची बदली करण्यात आली होती परंतु एवढे रामायण घडूनही त्यांनाच या पदावर ठेवून गोरगरीब बांधकाम कामगारांच्या न्याय हक्कावर सोलापूरातील कोणत्या नेत्याला पाणी सोडायच आहे हेही एकदा समोर आले पाहिजे

### सोलापूर जिल्ह्यात कामगार आयुक्त पदावरून रंगले राजकारण

# स्वर्गीय गुणवंत संभाजी सुरवसे यांच्या स्मरणार्थ स्मशानभुमीत बाकडे भेट



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा प्रतिनिधी/अमर जाधव

तांबरवाडी राजेवाडी गाव पहायला गेल तर विकासात्मक कामासाठी अग्रेसर गाव मनुन गावची ओळख आहे .आज गावच्या विकासात आणि सार्वजनिक सोयीसुविधांच्या उभारणीत समाजातील प्रत्येक व्यक्तीचा सहभाग महत्त्वाचा असतो. याच सदभावनेतून गावात एक सुंदर आणि समाजहिताचा उपक्रम राबविण्यात आला आहे.

तांबरवाडी राजेवाडी गावचे स्वर्गीय गुणवंत सुरवसे यांच्या पवित्र स्मरणार्थ गावातील स्मशानभूमी येथे अंत्यविधीसाठी आलेल्या वृद्धांना बसण्यासाठी आज सिमेंटचे आसन बाकडे बसविण्यात आले आहेत. या उपक्रमाद्वारे गावातील ग्रामस्थांना अंत्यविधीवेळी बसता यावे यासाठी गुणवंत सुरवसे यांचा मुलगा संजय गुणवंत सुरवसे यांनी ही संकल्पना मांडून स्मशानभूमी येथे नागरिकांना बसण्यासाठी बाकडे दिले

या सामाजिक उपक्रमामुळे ग्रामस्थांना स्मशानभूमी परिसरात विश्रांती घेण्यासाठी योग्य व्यवस्था उपलब्ध झाली आहे. तसेच या उपक्रमामुळे गावात स्वच्छता, सुव्यवस्था आणि सामाजिक एकता यांना चालना मिळाली आहे.

गावातील तरुणांनी आणि ग्रामस्थांनी या उपक्रमाचे मनापासून स्वागत केले असून, अशा प्रकारच्या सामाजिक कार्यांमुळे गावाचा विकास आणि सामाजिक बांधिलकी अधिक मजबूत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.यावेळी सरपंच. उपसरपंच .ग्रामपंचायत व तांबरवाडी राजेवाडीच्या समस्त ग्रामस्था तर्फे संजय सुरवसे .मुकेश सुरवसे सह सुरवसे परिवार यांचे मनापासून आभार मानन्यात आले आहेत ..

# उगाव विद्यालयातील खेळाडूंची मैदानी स्पर्धेत जिल्हापातळीवर निवड



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : महाराष्ट्र शिक्षण संस्थेचे छत्रपती शिवाजी हायस्कूल व दिनकरराव पानगव्हाणे कनिष्ठ महाविद्यालय उगाव येथील विद्यालयातील खेळाडूंची. लासलगाव येथे झालेल्या तालुका मैदानी स्पर्धेत विद्यालयातील खेळाडूंची जिल्हा पातळीवर निवड झाली असून यशस्वी खेळाडूंचा सत्कार विनता शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मधुकर आप्पा ढोमसे,उपाध्यक्ष साहेबराव पानगव्हाणे,संचालक नंदू राठी , सदाशिव आहेर. यांच्या हस्ते करण्यात आला असून उपस्थित मान्यवरांनी खेळाडूंना शुभेच्छा दिल्या शुभम मनोज वाघ १००मी धावणे,लांब उडी,कस्तुरी किशोर गायकवाड तिहेरी उडी, संस्कृती रामेश्वर गायकवाड २००मी.धावणे, ओम सुनील आहेर,तिहेरी उडी, मिनू दीपक राणा लांब उडी, वरील खेळाडूंची जिल्हा पातळीवर निवड झाली , त्यांना मार्गदर्शन करणारे क्रीडाशिक्षक भालचंद्र सूर्यवंशी व करीम तांबोळी यांचाही मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला या वेळी विद्यालयाचे प्राचार्य कैलास गवळी , पर्यवेक्षक नंदाराम ढिकले सर्व शिक्षक ,शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते

# अतिवृष्टीग्रस्तांना दिलासा; माहेश्वरी समाजाकडून मदत वाटप पूर्ण



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर /नागेश श्रीचिप्पा : सोलापूर जिल्ह्यातील अतिवृष्टीग्रस्त कुटुंबांना दिलासा देण्यासाठी सोलापूर जिल्हा माहेश्वरी सभा आणि समस्त मारवाडी समाज, सोलापूर यांच्या वतीने राबविण्यात आलेल्या 'पूरग्रस्तांना मदत अभियान'अंतर्गत मदत साहित्याचे वाटप यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आले. या उपक्रमाअंतर्गत पूरग्रस्त कुटुंबांना जीवनावश्यक वस्तूंचे किट वितरित करण्यात आले. यामध्ये ज्वारीचे पीठ, गहू पीठ, तांदूळ, खाद्यतेल, मसाले, मिठ, मेणबत्त्या, साखर, दुध पावडर, प्लास्टिक बादल्या, चादरी, सतरंजी, साबण, मच्छर अगरबत्ती, टॉर्च, बॅटऱ्या, तसेच भांडी, तवा, चमचा, काडेपेट्या आदी वस्तूंचा समावेश होता. दक्षिण सोलापूर तालुक्यातील वडकबाळ, तेलगाव, गाव पाथरी तसेच सेवा भारती शिव स्मारक येथे पूरग्रस्तांना धान्यकिट, साड्या, लहान मुलांचे कपडे, टॉवेल, सतरंजी आणि बेडशीटचे वाटप करण्यात आले. या वाटप कार्यक्रमास सोलापूर माहेश्वरी समाजाचे अध्यक्ष जवाहर जाजू, चंद्रकांत तापडिया, मधूसूदन कालानी, गोकुळ झंवर, प्रविण चंडक, आणि गोकुळ जाजू उपस्थित होते.

माहेश्वरी समाज आणि मारवाडी समाजाने दिलेल्या मदतीमुळे पूरग्रस्त कुटुंबांना तात्पुरता दिलासा मिळाला असून, दान नव्हे तर दिलासा द्या या समाजाच्या घोषवाक्याला प्रत्यक्षात उतरविण्यात आले आहे.

# सुफी सय्यद शमशोद्दीन यांना कर्तव्यदक्ष आदर्श समाजसेवक पुरस्कार २०२५ सन्मानित

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लातूर प्रतिनिधि/सुधाकर रणदिवे : लातूर जिल्ह्यातील भिसे वाघोली येथील सुपुत्र सुफी सय्यद शमशोद्दीन यांना कल्याण (मुंबई) येथे आजपर्यंत केलेल्या सामाजिक कार्याबद्दल इंडियन कॉपीराईट प्रोटेक्शन मुंबई व सहकर्म सामाजिक कल्याण फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने प्रत्येक वर्षी होणाऱ्या महाराष्ट्र गौरव सन्मान सोहळ्यात, कर्तव्यदक्ष आदर्श समाजसेवक पुरस्कार २०२५ देऊन सन्मानित करण्यात आले.



यावेळी मेजर गवई साहेब, साक्षी नाईक, शिवकुमार साळुंखे, अतिरिक्त आयुक्त जी एस टी, संदीप शर्मा, शकुंतला तायडे विजय वाघेला, सुमित्रा पाटील, काजल सुर्वे, मेहराजुन्नीसा अ.शकील ईत्यादि मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आयोजक रामजित गुप्ता यांच्या निवडीमुळे या पुरस्काराचे वितरण करण्यात आले.यावेळी लातूर येथील शिक्षक राजेंद्र क्षीरसागर यांनाही आदर्श शिक्षकरत्न पुरस्कार प्रदान करण्यात आले.तसेच धाराशिव जिल्ह्यातील कळंब येथील शिक्षक प्रा महादेव गपाट,प्रदिप यादव यांनाही शिक्षकरत्न पुरस्कार प्रदान करण्यात आल्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त विशेष कार्यक्रम

डॉ. सुशील शिंदे यांचे प्रतिपादन

# गांधीवादाच्या मुळाशी आत्मसन्मान, सत्य, अहिंसा आणि सत्याग्रह



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : 'गांधींचे तत्त्वज्ञान आत्मसन्मान, सत्य, अहिंसा आणि सत्याग्रह या चार प्रमुख मुद्द्यांवर आधारलेले असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. महात्मा गांधींच्या विचारांचा विद्यार्थ्यांपर्यंत पुरेसा प्रसार झालेला नाही, यामुळेच आजच्या पिढीमध्ये उद्दिष्टाभिमुख विचारांचा अभाव जाणवतो. दक्षिण आफ्रिकेत रेल्वे प्रवासात महात्मा गांधी यांचा अपमान झाला होता. त्यावेळी त्यांच्यातील आत्मसन्मान जागा झाला. त्यामुळेच त्यांनी आफ्रिकेतील उपेक्षित वंचित घटकांच्या न्याय हितासाठी लढा उभारला, असे मत राजकीय विचारवंत प्रा. डॉ. सुशील शिंदे यांनी केले.

रयत शिक्षण संस्थेच्या येथील कर्मवीर भाऊराव पाटील स्वायत्त महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना, समारंभ समिती व इतिहास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते गांधीवादाची आजच्या काळातील प्रस्तुतता या विषयावर प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. बाळासाहेब बळवंत हे होते.

डॉ. सुशील शिंदे पुढे म्हणाले की, गांधींनी आफ्रिकेतील संघर्षातून आत्मसन्मान व अहिंसेची शक्ती प्रत्यक्षात अनुभवली, फिनिक्स आश्रमातून सर्वोदयाची संकल्पना मांडली आणि सत्य प्रयोगांच्या आधारे सामाजिक परिवर्तन घडविले. फुले, शाहू, आंबेडकर यांसारख्या समाजपुरुषांच्या आत्मसन्मान जागृतीच्या उदाहरणांचा संदर्भ देत त्यांनी गांधीवादाच्या महत्त्वावर भर दिला. भगवद्गीतेतील अनासक्त योगाच्या प्रभावामुळे गांधींच्या विचारांत मानवतावाद व सहिष्णुतेचे तत्त्व प्रबळ झाले असल्याचे त्यांनी नमूद केले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना प्रभारी प्राचार्य डॉ. बाळासाहेब बळवंत म्हणाले की, महात्मा गांधींच्या विचारांतूनच राष्ट्राची खरी जडणघडण शक्य आहे. गांधीजींनी सत्याग्रहाच्या आंदोलनांत ७९ हजार किलोमीटरचा पायी प्रवास केला होता, ही त्यांच्या कार्यनिष्ठेची साक्ष आहे. आजही गांधीजींच्या विचारांचे प्रत्यक्ष प्रतिबिंब विविध शासकीय योजनांमध्ये दिसून येते.

या कार्यक्रमांतर्गत रयत इंग्लिश मीडियम स्कूल येथे स्वच्छता अभियान राबविण्यात आले. यात विद्यार्थी, विद्यार्थिनी व शिक्षक-शिक्षकेतर सेवकांनी उत्साहाने सहभाग नोंदविला. महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक समारंभ समितीचे प्रमुख डॉ. दत्ता डांगे यांनी केले. विद्यार्थिनी स्वाती मनगिनी हिने सूत्रसंचालन केले, तर आभार राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रकल्प अधिकारी डॉ. दत्तात्रेय चौधरी यांनी मानले. या कार्यक्रमास अधिष्ठाता डॉ. समाधान माने, प्रा. डॉ. महादेव कोरी, डॉ. दादासाहेब हाके, डॉ. रमेश शिंदे, डॉ. सुहास शिंदे, प्रा. सागर शिवशरण, प्रा. दत्तात्रय खिलारे, प्रा. बालाजी फुगारे आदींसह शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.